# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station लाप्रवि पहिली खबर क्र. FIR No. 13 वर्ष Year 2024 दिनांक Date 30/03/2024

2. (i) अधिनियम Act म.प्र. अधि. १९८८ कलमे Sections 7(अ), 12
(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून Date from 28/3/24 वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to 29/03/24 वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 29/03/2024 वेळ Time ........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 04/24 तारीख Date 30/03/2024 वेळ Time 06:24

4. माहितीचा प्रकार Type of Information समक्ष लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. उत्तरेस अं. १० कि.मी. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सह दुय्यम निबंधक कार्यालय मुं 19 ठिकाणाचा नंबर No. if any ........ गल्ली Ward खार (पश्चिम) रस्त्याचे नाव Name of road मुं. 50

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place नॅशनल कॉलेज गाव Village खार (प) पोस्ट Post मुंबई तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name संजय रामनिरंजन हरीलाल (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रामनिरंजन हरीलाल

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 55 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9820919993 / 7021880640

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation वकील

(g) धर्म Religion हिंदू जात Caste ........ उपजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address फ्लॅट नं 302 गल्ली/सर्व्हे नं. Ward हेरिटेज प्लाझा को-ऑप हौ. सोसायटी, कामगार कल्याण केंद्राजवळ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road गुंदवली जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place अंधेरी (पु) गाव Village मुंबई पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

1) खाजगी इसम - विशाल मारुती येरापले वय 20 वर्षे
2) लोकसेवक - गजानन प्रल्हादराव खोत वय 48 वर्षे, सह दुय्यम निबंधक वर्ग-२

(G.C.P.) K 1043 (A)-(1000-1-2025)

फिर्यादी नामे संजय रामनिरंजन हरित्वाल वय ५५ वर्षे, धंदा- लोकवकील रा.ठी. फ्लॅट नं. ३०२, हेरीटेज हाऊस को. ऑप. हौ. सोसा, मिनी कामगार कल्याण केंद्राजवळ, गुंडवली, अंधेरी (प) मुंबई यांचा जबाब स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आला असून तोच गुन्हयाची पहिली खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(signature)

(निलेश पाटिल)
पोलीस निरीक्षक
लाप्रवि मुंबई

(signature)
Sanjay R Haritwal

फिर्याद दिनांक. ३०/०३/२०२५

श्री. संजय रामनिरंजन हरीत्वाल, ५५ वर्षे, धंदा . वकील, रा.ठी. फ्लॅट क्र. ३०२, हेरीटेज हाऊस को. ऑप.हौ.सो.लीमी, आझाद रोड, कामगार कल्याण केंद्राजवळ, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई मो.न. ९८२०६९१९९३/७०२१४४७६७०.

---

मी, वरील ठिकाणी एप्रिल, २०२३ पासुन कुटुंबासह राहवयास आहे. मी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सन २००५ पासुन वकील म्हणुन काम करतो. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी सध्या राहत असलेल्या हेरीटेज हाऊस को.ऑप.हौ.सो.लि. च्या समोरील हरीत निवास, फ्लॅट क्र. ०६ या बिल्डींग मध्ये जुन १९९४ ते एप्रिल २०२३ याकालावधीत राहत होतो. तरी एप्रिल २०२२ मध्ये हरीत निवासमधील फ्लॅट क्र. ०५ चे मालक याने व्यवसायाकरीता सदरचा फ्लॅट गहाण ठेऊन त्यावर आर.बी.एल. बँकेचे लोन घेतले होते. मात्र त्यांनी ते वेळेत न भरल्याने बॅकेमार्फतीने पेगासेस असेट रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने तो फ्लॅट ताब्यात घेतल्याबाबत मला माहिती मिळाली होती.

त्यानंतर पेगासेस असेट रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने हरीत निवासमधील फ्लॅट क्र. ०५ याचा दोन ते तीन वेळेस लीलाव केला. मात्र फ्लॅटची किंमत जास्त असल्यामुळे फ्लॅटची विक्री झाली नाही. त्यानंतर ऑगस्ट २०२४ मध्ये पेगासेस असेट रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीचे ऑफीसर रोहन कदम हे मला भेटले व त्यांनी मला **"आप अगर ये फ्लॅट लेना चाहते हो, तो कंपनी इस फ्लॅट का रेट कम करने को तैय्यार है".** त्यावेळी मी त्यांच्यासोबत फ्लॅटच्या बाजारभावाबद्दल चर्चा करून तडजोड करून फ्लॅट खरेदी करण्याचे ठरवले. त्यानंतर मी ॲक्सीस फायनांन्स लि.मी., गोरेगाव (पूर्व), मुंबई येथुन लोन केले. लोन मंजुर झाल्यानंतर मी पेगासेस असेट रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीचे ऑफीसर रोहन कदम यांना लोन मंजुरीबाबत माहिती दिली. त्यानंतर रोहन कदम यांनी दिनांक ०३/१२/२०२४ रोजी हरीत निवासमधील फ्लॅट क्र. ०५ चा लीलाव ठेवला. नमुद लिलावामध्ये मी सहभाग घेउन सदर फ्लॅट ९२,२५,०९०/— रूपयामध्ये मी माझ्या पत्नीच्या व माझे नावे खरेदी केला.

त्यानंतर मी पेगासेस असेट रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीला फ्लॅट क्र. ०५ खरेदीचे पेमेंट पूर्ण केलेले आहे. पेगासेस असेट रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने मला दिनांक १६/१२/२०२४ रोजी फ्लॅट क्र. ०५ चे खरेदी केल्याचे सेल सर्टीफिकेट दिले. त्यानंतर दिनांक २०/१२/२०२४ रोजी पेगासेस असेट रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने मला फ्लॅट क्र. ०५ ची चावी व पजेशन लेटर दिले. त्यानंतर शासकीय नियमानुसार सदर सेल सर्टीफिकेट मला स्टॅम्प डयुटी भरून ०४ महीन्यांचे कालावधीमध्ये रजिस्ट्रेशन करावयाचे होते. मात्र त्या दरम्यान माझी पत्नी सौ. ममता हरीत्वाल, वय ४८ वर्ष हीचे ब्रेन टयुमरचे ऑपरेशंन करावयाचे असल्यामुळे मला नमुद फ्लॅटचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी उशिर झाला.

त्यानंतर, मार्च २०२५ मध्ये मी माझ्या जुन्या ओळखीचा एजंट विशाल येरापले, वय ३० वर्ष याला भेटुन फ्लॅट क्र. ०५ ला रजिस्ट्रेशन करावयाचे असल्याचे सांगून स्टॅम्प डयुटी किती भरावी लागेल, याबाबत विचारणा केली असता विशालने ४,६१,५००/— रूपये स्टॅम्प डयुटी व ३०,०००/— रूपये रजिस्ट्रेशन शुल्क भरावे लागेल, असे सांगीतले. त्यामुळे मी, सदर शुल्क भरण्यास तयार झालो. मी माझ्या ठाणे जनता सहकारी बॅक लि., (टि.जे.एस.बी.), विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथील खात्यामधुन सहाय्यक दुय्यम निबंधक यांचे शासकीय बॅक खाते पंजाब नॅशनल बॅक, खार लिकींग रोड, मुंबई या मध्ये दिनांक १७/०३/२०२५ रोजी स्टॅम्प डयुटी व रजिस्ट्रेशन शुल्क असे एकुण ४,९१,५००/— रूपये ट्रान्सफर केले. नमुद फ्लॅटचे सर्व मूळ कागदपत्रे विशालजवळ दिले असता विशालने मला दिनांक १८/०३/२०२५ रोजी सह दुय्यम निबंधक कार्यालय, खार टेलीफोन एक्सचेंज बिल्डींग, लिकींग रोड, खार (प.), मुंबई येथे मला, पत्नी व साक्षीदार यांस घेउन येण्यास सांगीतले.

त्यामुळे मी, दिनांक १८/०३/२०२५ रोजी माझी पत्नी ममता, वय ४८ वर्ष व माझे मित्र समीर सुलेमान सय्यद, वय ५३ वर्ष यांचेसह खार येथील सहा. दुय्यम निबंधक कार्यालय येथे गेलो. त्या ठिकाणी विशालने फ्लॅट क्र. ०५ चे रजिस्ट्रेशनची प्रक्रीया पूर्ण करून दिली व सुची क्र. ०२ ची पावती दिली. नमुद पावतीमध्ये रजिस्ट्रेशन क्र. ४४१४/२०२५ असा होता. त्यानंतर सह दुय्यम निबंधक कार्यालय येथुन जात असतांना मी विशाल याला फ्लॅटचे नोंदणी केल्याबाबतचे ओरीजनल कागदपत्रे केव्हा मिळतील, असे विचारले असता

विशालने मला सांगीतले कि, " श्री. गजानन खोत, सह दुय्यम निबंधक साहबने बोला है, कि फ्लॅट के रजिस्ट्रेशन करते समय फ्लॅट महीला के नाम पर होने जा रहा है, तो शासन का नियम है, कि महीला के नाम पर फ्लॅट लिया तो मुद्रांक शुल्क मे एक टक्का डिस्काउंट मिलता है और हमने ओ डिस्काउंट कर के दिया है, इसलीये हमे ५५,०००/– रूपये चाहीये" असे सांगीतले. त्यानंतर मी विशाल याला ते मुळ कागदपत्रे परत देण्याबाबत आपण सह दुय्यम निबंधक साहेबांना विनंती करू, असे बोललो असता विशालने त्यास नकार देउन पैसे दिल्याशिवाय ते मुळ कागदपत्रे परत करणार नसल्याचे सांगीतले. सदरचे रजिस्ट्रेशनचे कागदपत्र मिळवून देण्याकरीता श्री. खोत यांचे वतीने एजंट विशाल याने माझ्याकडे रू. ५५,०००/– लाचेची मागणी केली आहे.

माझे काम करणे हे शासकीय अधिकारी यांचे कर्तव्य असुन त्याकरिता ते माझ्याकडुन रू. ५५,०००/– इतकी लाच मागत आहेत. सह दुय्यम निबंधक श्री. खोत व एजंट विशाल यांचा व माझा इतर कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मला शासकीय अधिकारी व एजन्ट यांस लाच देण्याची इच्छा नसल्याने मी सह दुय्यम निबंधक श्री. खोत व श्री. विशाल यांचे विरोधात दिनांक २८/०३/२०२५ रोजी ला.प्र.वि., मुंबई कार्यालयात स्वहस्ताक्षरात लेखी अर्ज केला होता. मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे वरिष्ठांना भेटल्या नंतर वरिष्ठांनी स.पो.आ. दयानंद सावंत व पोलीस निरीक्षक निलेश पाटील यांना बोलावून घेतले. माझ्या तक्रार अर्जावर पुढील कार्यवाही तपासी अधिकारी म्हणून पो.नि. पाटील व पर्यवेक्षक अधिकारी स.पो.आ. सावंत हे काम बघतील असे सांगून त्यांच्या सोबत जाण्यास सांगितले. स.पो.आ. सावंत व पो.नि. पाटील यांनी मला रूम नं. २०७ येथे घेवून गेले. तेथे गेल्यांनतर माझा तक्रार अर्ज पो.नि. पाटील यांच्याकडे दिला, त्यांनी तो वाचून त्यांच्या ताब्यात ठेवला व विचारणा केली असता मी वरिलप्रमाणे हकीकत सांगितली. सदरबाबत दि. २९/३/२५ रोजी कार्यवाही करण्याचे ठरले.

ठरल्याप्रमाणे दि.२९/३/२०२५ रोजी ११.३० वा. च्या सुमारास आलो. नमुद तक्रार अर्जामध्ये सरकारी नोकर यांच्या वतीने खाजगी इसम याने लाचेची मागणी केली असल्याने पो.नि. पाटील यांनी माझ्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पडताळणी/सापळापूर्व/सापळा कार्यवाही करण्यात येणार असल्याचे मला सांगुन तात्काळ ०२ पंच व पोलीस पथकास पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. त्यानंतर पंचांना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगून मी केलेला तक्रार अर्ज दोन्ही पंचांस वाचण्यास दिला तसेच सदरचा अर्ज मराठित समजुन सांगितला. माझे तक्रार अर्जावर पंचाच्या व समक्ष म्हणून पो.नि. पाटील यांनी सही केलेली आहे.

त्यानंतर पो.नि. पाटिल यांनी मला सापळापूर्व/सापळा कारवाई करण्यापूर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. पाटील व ०२ सरकारी पंच हे ला.प्र.वि. कार्यालयातील पहील्या माळयावरील, रूम नं. १०२, गोपनीय कक्षामध्ये गेले. तेथे मी, पो.नि. पाटील व ०२ पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरसहाय्याने मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर अंदाजे १४:४५ वा च्या सुमारास ला.प्र.वि. कार्यालयाच्या बाहेर येवून मी, पंच, पो.नि. पाटील, स. पो.आ. सावंत हे खाजगी वाहनाने व दुसरे पंच व पोलीस पथक हे दोन शासकीय वाहनातून एका पाठोपाठ सी–लिंक ओलांडल्यानंतर नॅशनल कॉलेजच्या समोर, खार, मुंबई कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे जावून थांबलो. पो.नि. पाटील यांनी दुसऱ्या शासकीय वाहनातील पोलीस पथक यांना सी–लिंक ओलांडल्या चेकनाक्याजवळ रस्त्यालगत कोणास संशय येणार नाही अशा रितीने पुढील आदेशापर्यंत थांबण्याच्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे दुसरे वाहनातील पथक हे सदर ठिकाणी थांबुन राहीले.

पो.नि. पाटील यांच्या सांगणेवरून पो.ह. मठपती यांनी माझ्या शर्टाचे आतील बाजूस बनियानला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून सुरू केला. त्यानंतर माझे सोबत पंच क्र. २ श्री. शिवसागर शर्मा असे आम्ही एजन्ट विशाल व श्री. खोत, सह दुय्यम निबंधक यांना भेटण्यास त्यांचे सह दुय्यम निबंधक, खार येथील कार्यालयात गेलो.

श्री. खोत यांच्या कार्यालयात गेल्यावर मला तिथे विशाल भेटला. मी त्याला माझ्या कामाबद्दल विचारले असता त्याने मला ५५,०००/– इतकी रक्कम द्यावीच लागेल, असे सांगितले. त्यावर मी, विशालला नमुद रक्कमेबद्दल श्री. खोत साहेबांना विचारून २०,०००/– ते २५,०००/– रूपयांपर्यंत विनंती करण्यास सांगितले. त्यानंतर विशाल ने मला सांगितले की, मी श्री. खोत साहेबांशी बोलून कळवितो, असे म्हणून विशाल श्री. खोत साहेबांच्या केबिनमध्ये गेला. थोडया वेळाने विशाल बाहेर येऊन त्याने मला सांगितले की, साहेबांनी ३५,०००/– रूपये देण्याबाबत सांगितले आहे. त्यावर मी विशालला पैशांची व्यवस्था करून येतो असे सांगून मी व पंच क्र.

०२/शर्मा हे शासकीय वाहन थांबविलेल्या ठिकाणी पुन्हा आलो. तेथे आल्यानंतर माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पो.ह. मठपती यांनी बंद केला. त्यानंतर सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण हे पोलीस व पंचानी ऐकले असता मी सांगितल्याप्रमाणे संभाषण असल्याचे समजुन आले.

अशाप्रकारे एजन्ट विशाल याने श्री. खोत यांच्यावतीने रू. ३५,०००/— लाचेची मागणी केल्याचे पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झाल्यावर स.पो.आ. सावंत व पो.नि. पाटील यांनी मला व पंच क्र. २/शर्मा यांना पुढील सापळा कारवाईच्या सूचना दिल्या. मी केलेल्या बचती मधून ठेवलेले रू ३५,०००/— स.पो.आ. सावंत यांच्याकडे दिले. पोलीस पथकाने पंचां समक्ष रू. ३५,०००/— रक्कमेच्या नोटांचे फोटो काढले. त्यानंतर वाहन चालक पो.उ.नि. जामसंडेकर यांनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावून ती रक्कम एका वर्तमान पत्रामध्ये गुंडाळून माझ्या पॅन्टच्या उजव्या खिश्यात ठेवली. पो.ह. मठपती यांच्या मदतीने मला लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पुन्हा सुरू करण्यात आला. मी व पंच क्र २/शर्मा असे पुन्हा श्री. खोत यांच्या कार्यालयाच्या दिशेने निघालो. माझ्या मागोमाग स.पो.आ. सावंत, पो.नि. पाटील व पंच क्र. १ व पोलीस पथक हे काही अंतरावर कार्यालयाच्या जवळपास उभे होते. मी, सह दुय्यम निबंधक, खार, मुंबई या कार्यालयात विशाल याला भेटलो व त्याला मी माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशातून ठेवलेली लाचेची एकूण रक्कम ३५,०००/— रूपये दिले. ती त्याने मोजुन ताब्यात घेतली व तो श्री. खोत यांच्या केबीनच्या दिशेने चालत जाउन केबिनमध्ये गेला व त्याने नमुद लाचेची रक्कम श्री. खोत हे बसलेल्या टेबलच्या ड्रावरमध्ये ठेवले मी व पंच शर्मा यांनी पाहिले. त्यावेळी लोकसेवक यांनी खाजगी इसमास कोणतीही बाधा आणली नाही. त्यानंतर ठरल्याप्रमाणे मी पोलीस पथकास कार्यालयाच्या बाहेर येउन तोंडावर रूमाल फिरवून इशारा केल्यावर पोलीस पथक हे कार्यालयात प्रवेश केला. सदरवेळी पो.ह. मठपती यांनी माझा व्हाईस रेकॉर्डर बंद करून तो ताब्यात घेतला.

श्री. खोत साहेबांच्या कार्यालयात ला.प्र.वि. कार्यालयाच्या कार्यवाही प्रकिया पूर्ण झाल्यानंतर पंचनामा कार्यवाहीकरीता मी, पोलीस पथक, पंच व सह दुय्यम निबंधक श्री. खोत, श्री. विशाल असे शासकीय वाहनातून ला.प्र.वि. कार्यालयास जाण्यास निघालो व अंदाजे २०:३५ वा कार्यालयात पोहचलो

तरी मी पेगासेस असेट रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीकडून लिलावामध्ये खरेदी केलेला फ्लॅट क्र. ०५, हरीत निवास बिल्डींग, आझाद रोड, कामगार कल्याण केंद्राजवळ, गुंडवली, अंधेरी (पूर्व), मुंबई यांचे दि. १८/३/२५ रोजी शासकीय नियमानुसार सेल सर्टीफिकेट कागदपत्र रजिस्ट्रेशन करण्यासाठी स्टॅम्प डयुटी व रजिस्ट्रेशन फि भरून देखील माझ्या नमुद फ्लॅटचे मूळ कागदपत्रे परत देण्याबाबत सह दुय्यम निबंधक श्री. खोत यांनी खाजगी इसम एजन्ट श्री. विशाल याचेकडून माझ्याकडे पहिल्यांदा ५५,०००/— इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केली होती. व दिनांक २९/०३/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पडताळणी कारवाईत व सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम विशाल यांनी सह दुय्यम निबंधक श्री. खोत यांचे सांगणे तडजोडीअंती रू. ५५,०००/— वरून रू. ३५,०००/— इतकी लाचेची रक्कम मागणी करून स्विकारली व सदर रक्कम गजानन खोत, सह दुय्यम निबंधक हे बसलेल्या टेबलच्या ड्रावरमध्ये ठेवली म्हणुन माझी गजानन खोत, सह दुय्यम निबंधक, खार, मुंबई व एजन्ट श्री. विशाल यांच्या विरोधात कारवाई होण्याकरीता तक्रार आहे.

माझे लोकसेवक सह दुय्यम निबंधक श्री. खोत व खाजगी इसम विशाल यांचे बरोबर कोणतेही देवाण घेवाण चे आर्थिक व्यवहार नाहीत किंवा कोणतेही पुर्ववैमनस्य नाही.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून, ती मला मराठीत वाचून तसेच समजावून सांगितली असता, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(निलेश पाटील)
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

30/03/2025

10. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे फ्लॅटचे रजिस्ट्रेशन खाजगी इसमयांच्या मदतीने सहाय्यक दुय्यम निबंधक क्रो-२ मुंबई-११ खार (प) मुंबई येथे करुन झाल्यानंतर फ्लॅटचे मूळ कागदपत्र लोकसेवक यांनी फिर्यादीस परत न करता लोकसेवक यांनी खाजगी इसमाला प्रोत्साहन देऊन त्याच्या मार्फतीने रु.५५,००.०००/- लाच्या मागणी फिर्यादीकडे करुन तडजोडी अंती रु.३५,०००/- खाजगी इसमास स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद क्र. १३/२५ कलम-७(अ), १२, भ्र.प्र. अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........

**2.** तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

**Action taken :** Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........

(3) Transferred to P. S. ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ... निलेश पाटील

पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........

1. Date and time of submitted to the Court.

| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report